**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार, दिनांक २१ एप्रिल २०२४**

**ठळक बातम्या**

1. **लोकसभा निवडणूकीच्या तिसऱ्या टप्प्यात राज्यातील ११ मतदारसंघातून ३१७ उमेदवारांचे अर्ज वैध- ७ मे रोजी होणार मतदान.**
2. **'आमचं राजकारण हे जबाबदारी, उत्तरदायित्व, विकास पत्र आणि विकासाचं राजकारण आहे- भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा याचं बुलढाणा जिल्ह्यातील प्रचारसभेत प्रतिपादन.**
3. **मतदानाचं प्रमाण वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विविध उपक्रमांचं आयोजन.**

**आणि**

4. **पुढील तीन दिवस विदर्भाच्या काही भागात मेघगर्जनेसह तुरळक पावसाची शक्यता-उद्या संपूर्ण विदर्भासाठी येलो अलर्ट जारी.**

*****

तिसरा/चौथा टप्पा

राज्यातील लोकसभा निवडणूकीच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदान ७ मे रोजी होणार आहे. यासाठी राज्यातील ११ मतदारसंघात ३६१ उमेदवारांचे ५२२ अर्ज दाखल झाले होते. अर्जांची छाननी केल्यानंतर एकूण ३१७ उमेदवारांचे अर्ज वैध असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे. तिसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर रायगड लोकसभा मतदार संघात २१, बारामती- ४६, उस्मानाबाद- ३५, लातूर-३१, सोलापूर- ३२, माढा-३८, सांगली-२५, सातारा-२१, रत्नागिरी-सिंधुदुर्ग-९, कोल्हापूर- २७ आणि हातकणंगले मतदारसंघात- ३२ असे एकूण ३१७ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत.

उद्या सोमवारी अर्ज मागे घेण्याचा अखेरचा दिवस आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. चौथ्या टप्प्यात नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या ९६ लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. यामध्ये राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर आणि शिर्डी या ११ मतदारसंघांचा समावेश आहे. चौथ्या टप्प्यासाठी या महिन्याच्या २५ तारखेपर्यंत अर्ज दाखल करता येणार असून, १३ मे रोजी मतदान होणार आहे.

जे.पी.नड्डा बुलढाणा सभा

आमचं राजकारण जे जबाबदारी, उत्तरदायित्व,विकास पत्र आणि विकासाचं राजकारण आहे. आज आपण ५ वी मोठी अर्थव्यवस्था बनलो आहोत आणि आता लवकरच जगातील तिसरी मोठी  अर्थव्यवस्था बनवायची असेल तर हे सरकार पुन्हा यायला हव. मजबूत आणि स्थिर सरकार होत म्हणून आम्ही ३७० कलम हटवू शकलो, तीन तलाक रद्द करू शकलो. आता आपल्याला २०४७ पर्यंत विकसित भारत बनवायचा असेल तर भाजप पुन्हा सत्तेत यायला हव.'असं प्रतिपादन भाजप राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांनी बुलढाण्यात केलं. आज सकाळी बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना शिंदे गट आणि भाजपा महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या प्रचारार्थ बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातील वरवट बकाल इथं  नड्डा यांची यांची जाहीर सभा झाली, त्यावेळी ते बोलत होते. ८० कोटी लोकांना दरमहा मोफत राशन दिल्यामुळे २५ टक्के  लोक गरिबी रेषेच्या वर येऊ शकले. उज्वला गॅस योजना, आवास योजना, हर घर जल योजना आदींमधून आम्ही सामान्य माणसाचा विकास साधला असंही ते म्हणाले. यूपीए  गटावर शरसंधान साधतांना त्याचं सरकार म्हणजे परिवारवाद आणि भ्रष्टाचाराला खत पाणी घालणार होतं अशी टीका त्यांनी केली.

महाविकास आघाडी सभा

बुलडाणा लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार प्रा.नरेंद्र खेडेकर यांच्या प्रचारार्थ आज सायंकाळी बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव शहरात माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, माजी केंद्रीय मंत्री राज्यसभा खासदार मुकुल वासनिक यांची जाहीर सभा संपन्न होणार आहे.

अमित शहा अकोला दौरा

मंगळवार दिनांक 23 एप्रिल रोजी केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा अकोला दौऱ्यावर येत असून भाजप महायुतीचे उमेदवार अनुप धोत्रे यांच्या प्रचारार्थ ते जाहीर सभेला संबोधित करणार आहे. या प्रचार सभेचं आयोजन अकोला क्रिकेट क्लब मैदानावर करण्यात आलं आहे.

उद्धव ठाकरे पत्रकार परिषद

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रचारगीतातून हिंदू धर्म आणि जय भवानी हे शब्द वगळण्याची सूचना केंद्रीय निवडणूक आयोगानं केली आहे. आपल्या पक्षाच्या मशाल या चिन्हासाठी तयार केलेल्या प्रचारगीतात हे दोन शब्द आहेत मात्र, प्रचारगीतातून हे शब्द वगळणार नाही, यासाठीचा न्यायालयीन लढा आम्ही लढू असं अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी आज मातोश्री निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितलं. नरेंद्र मोदी आणि अमित शहा हे देव धर्माच्या नावावर मत मागत असल्याचा आरोप करत त्याबाबतचं पत्र आपण निवडणूक आयोगाकडे पाठवल्याचं त्यांनी सांगितलं मात्र निवडणूक आयोगाने यावर उत्तर दिलं नाही, अशी माहिती त्यांनी दिली.

वर्धा निवडणूक जिल्हाधिकारी

वर्धा जिल्ह्यात येत्या २६ तारखेला मतदान होणार आहे. भारत निवडणूक आयोगानं निवडणूक कामकाजासाठी नेमलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना टपाली मतपत्रिका व निवडणूक कार्य प्रमाणपत्र -ई.डी.सी.- व्दारे मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. ज्या लोकसभा मतदारसंघात मतदार म्हणून नाव नोंदणी झाली असेल व त्याच लोकसभा मतदारसंघात निवडणूक कर्तव्यावर असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना निवडणूक कार्य प्रमाणपत्राव्दारे मतदान करता येणार आहे. त्यामुळे पात्र अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मतदान करावं असं आवाहन  वर्धा जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केलं  आहे.

बुलढाणा निवडणूक जागृती

बुलढाणा जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी दिनांक 26 एप्रिल रोजी मतदान होणार आहे. सध्यास्थितीतील जिल्ह्यातील उष्ण तापमानाच्या पार्श्वभूमीवर मतदानासाठी येणाऱ्या मतदारांच्या सुलभतेसाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहे. यावर्षी प्रामुख्याने टोकन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. यात मतदान केंद्रावर येणाऱ्या प्रत्येकाला टोकन देण्यात येणार आहे. मतदानासाठी एकावेळी फक्त पाच मतदार रांगेत उभे राहतील. उर्वरीत टोकन असणाऱ्या मतदारांसाठी मतदान केंद्राच्या बाजूच्या खोलीत बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे.

वाशीम निवडणूक जागृती

शुक्रवार दिनांक 26 एप्रिल रोजी होणाऱ्या मतदानासाठी वाशीम जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज असून, शांततेत मतदान पार पडेल या उद्देशानं जिल्हा प्रशासन काम करीत आहे. निवडणूक आयोगाने शेवटच्या मतदारही मतदानापासून वंचित राहणार नाही या उद्देशाने काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याअनुषंगाने जिल्हा प्रशासन आणि निवडणूक विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबविले जात आहे. यावेळी मतदानाची टक्केवारी 75 टक्क्यापर्यंत नेण्याचा प्रशासनाचा मानस आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनाला प्रसिद्धी माध्यमांच्या सहकार्याची नितांत गरज आहे. प्रसारमाध्यमांनी मतदानविषयी जनजागृती करण्यास तसेच प्रशासनाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांना प्रसिद्धी देऊन सहकार्य करावं, असं आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी केलं.

महावीर जयंती

जैन धर्मियांचे चोवीसावे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्तानं त्यांना आज सर्वत्र नमन केलं जात आहे. यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. अहिंसा आणि करुणेचे प्रतीक असलेले भगवान महावीर यांनी प्रेम-शांतीचा संदेश देत सत्य आणि त्यागाचा मार्ग दाखवल्याचं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. भगवान महावीर यांनी शांतता, बंधुभाव आणि समाजाच्या उन्नतीचा मार्ग दाखवला असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीच्या भारत मंडपम इथं भगवान महावीर यांचं पोस्टाचं तिकीट आणि नाण्याचं प्रकाशन करण्यात आलं.

माओवादी ठार

छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात आज सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत एक माओवादी ठार झाला. जिल्ह्यातील भैरमगड भागात माओवाद्यांच्या उपस्थितीची गुप्त माहिती मिळाल्यावर जिल्हा राखीव रक्षक दलाने शोध मोहीम सुरू केली. दरम्यान, आज सकाळी केशकुतुलच्या जंगलात पोलिस आणि माओवाद्यांमध्ये चकमक झाली. चकमकीनंतर घटनास्थळावरून शस्त्रे, स्फोटके आणि इतर संबंधित साहित्य जप्त करण्यात आले आहे.

हवामान

विदर्भात मागील २४ तासात वाशिम जिल्ह्यात सर्वाधिक कमाल तापमान ४३.२ अंश सेल्सिअस तर नागपुरात ४०.२ अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. येत्या ३ दिवसांत हवामान अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता असून काही ठिकाणी मेघगर्जनेसह तुरळक पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. उद्या विदर्भातील नागपूरसह वाशिम, यवतमाळ, वर्धा आणि अमरावती जिल्ह्यात वीजांच्या कडकडाटासह वादळ सोसाट्याचा वारा तर यवतमाळ, अमरावती, वर्धा, नागपूर या ठिकाणी गारपीटीची शक्यता वर्तविण्यात आली असून विदर्भातील सर्व जिल्ह्यांसाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मात्र या आठवड्यात कमाल तापमानात फारसा बदल होणार नसल्याचं प्रादेशिक हवामान खात्यानं कळविलं आहे.

******